# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

---

## परिपत्रक

**विषय : संशोधन मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :** 1. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र.** 196/2023 **दिनांक:** 04/09/2023
2. **शिक्षक मान्यता कक्षाचे परिपत्रक क्र.** 278/2023 **दि.** 08/11/2023
3. **विद्यापीठ परिपत्रक क्र.** 07/2024 **दि.** 09/01/2024

उपरोक्त संदर्भ क्र. 1 परिपत्रकान्वये पीएच्.डी. मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र व संशोधन मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिनांक 02 नोव्हेंबर, 2023 पर्यंत पूर्ण करण्यास कळविण्यात आले होते.

सबब, संदर्भ क्र. 2 व 3 च्या परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

1. संशोधन मार्गदर्शक ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे, त्या महाविद्यालयात संबंधित विषय हा पदव्युत्तर पदवी स्तरावर शिकविला जात असेल तरच संबंधित विषयात संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता असेल अन्यथा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध नसलेल्या महाविद्यालयातील संशोधन मार्गदर्शकांना आगामी पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

2. संशोधन मार्गदर्शक ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे, त्या मूळ महाविद्यालयात त्या विषयाचे संशोधन केंद्र नसेल तर त्यांना दुस-या संशोधन केंद्रात संशोधन मार्गदर्शक होता येणार नाही परंतु त्यांना विहीत नियमानुसार सहमार्गदर्शक म्हणून काम करता येईल.

3. जे संशोधन मार्गदर्शक मूळ महाविद्यालयात संशोधन केंद्र नसल्याने इतर संशोधन केंद्रात कार्यरत आहेत, त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांना पीएच्.डी. पदवी घोषित होईपर्यंत ते मार्गदर्शन करतील परंतु त्यांना नवीन विद्यार्थी घेता येणार नाहीत किंवा त्यांना आगामी पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

वरीलपैकी उर्वरित ज्या संशोधन मार्गदर्शकांनी यापूर्वी त्यांच्याकडील रिक्त जागा अद्ययावत केल्या आहेत किंवा ज्या संशोधन मार्गदर्शकांकडे सद्यस्थितीत जागा रिक्त झाल्या आहेत किंवा ज्या संशोधन मार्गदर्शकांना नव्याने संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. अशा मार्गदर्शकांना पुन:श्च किंवा नव्याने जागा अद्ययावत करावयाच्या आहेत, त्या संशोधन मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉगीनमधून त्यांच्याकडील रिक्त जागा अद्ययावत कराव्यात. तद्नंतर संबंधित संशोधन केंद्रांनी त्यांचे मार्गदर्शकाकडील पुन:श्च किंवा नव्याने अद्ययावत केलेल्या रिक्त जागा प्रवर्गनिहाय ऑनलाईन पध्दतीने मान्यता द्यावी. ही सर्व प्रक्रिया दि. 31 जानेवारी, 2024 पर्यंत पूर्ण करावी.

वरीलप्रमाणे संशोधन मार्गदर्शकांनी पूर्वी किंवा नव्याने रिक्त जागा संशोधन केंद्रांनी त्यांच्या लॉगीनमधून त्यांचेकडील तपशील घोषित केलेला आहे, त्या संशोधन मार्गदर्शकांच्या खालील बाबी तपासून ऑनलाईन पध्दतीने मान्यता द्यावी.

1. संशोधन मार्गदर्शकाकडे विद्यापीठाकडून प्राप्त झालेले वैध संशोधन मार्गदर्शक मान्यता पत्र असल्याची खात्री करावी
2. संशोधन मार्गदर्शक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात कार्यरत आहे, याबाबतची खात्री करावी.
3. संशोधन केंद्राकडे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहे व सदरील संशोधन मार्गदर्शक हा आपल्याच संशोधन केंद्रात पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत आहे, याबाबतची खात्री करावी.

या सर्व बाबींना संशोधन केंद्रांने त्यांच्या लॉगीनमधून मान्यता दिल्यानंतरच तात्काळ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर रिक्त जागांचा तपशील घोषित केला जाईल व तो घोषित झाल्याबाबतची खात्री संबंधित संशोधन केंद्रांनी https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/Applicant/SearchGuideVacancies.aspx या लिंकवर करून घ्यावी. जे संशोधन केंद्रे सदरील बाबी तपासून मान्यता देतील, त्या संशोधन केंद्रांचा रिक्त जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार आहे. संशोधन मार्गदर्शकाकडे वरीलपैकी कोणत्याही एक किंवा अधिक मुद्याबाबत त्रुटी असेल तर सदरील संशोधन मार्गदर्शक वगळता पूर्तता केलेल्या संशोधन मार्गदर्शकांना मान्यता देऊन त्यांचा तपशील घोषित करण्याबाबत कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे संशोधन मार्गदर्शकांकडील सर्व कागदपत्रे व्यवस्थितरित्या तपासूनच संबंधित संशोधन मार्गदर्शकांना मान्यता देण्यात यावी. वरीलप्रमाणे पीएच्.डी. प्रक्रियेत त्रुटी राहील्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचनेप्रमाणे पीएच्.डी. अभ्यासक्रमाच्या वैधतेसंदर्भात अडचणी उद्‌भवू शकतात. सबब, संशोधन केंद्र प्रमुखांनी अतिशय काळजीपूर्वक वरील माहितीस मान्यता द्यावी.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. 020-71533633 अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

गणेशखिंड, पुणे 411007 )
संदर्भ: शै.प्रवेश/ 318 )
दिनांक: 24/01/2024 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी.

D:\PET 2023\Circulars.docx